आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००  वाजता

२२ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद - प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा प्राधान्यक्रम असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- कर्करोग मूनशॉट उपक्रमासाठी साडेसात दशलक्ष डॉलर आणि ४० दशलक्ष लस मात्रा देण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा

- आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला चार जागा देण्याची केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची मागणी

- पुण्यातल्या खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीच्या आत्महत्या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून दखल

**आणि**

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात बांगलादेशावर २८० धावांनी विजय मिळवत भारताची मालिकेत १-० अशी आघाडी

**<><><><><><>**

मुक्त, खुलं, सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद - प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा एक सामायिक प्राधान्यक्रमावरचा विषय आहे, आणि त्यासाठी सर्व सदस्य देश वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल अमेरिकेत डेलावेर इथं झालेल्या क्वाड देशांच्या शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते.

सध्या जग तणाव आणि संघर्षानं वेढलेलं असताना ही परिषद होत आहे, अशावेळी क्वाड सदस्य देशांनी सामायिक लोकशाही मूल्यांच्या आधारावर एकत्र काम करणं संपूर्ण मानवतेसाठी खूप महत्वाचं असल्याचं ते म्हणाले. एका संघटनेच्या माध्यमातून एकत्र येणं याचा अर्थ कोणाच्याही विरोधात जाणं नाही, त्याउलट एकत्र येत काम करण्याचा अर्थ हा, नियमाधारित आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि सर्व समस्यांचे शांततापूर्ण निराकरण करण्याला पाठबळ देणं असं आहे, असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी क्वाड संघटनेनं आरोग्य, सुरक्षा, अत्यावश्यक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, हवामान बदल आणि क्षमतावृद्धी सारख्या क्षेत्रांसाठी केलेल्या उपायोजनात्मक नियोजनाचा उल्लेख केला. २०२५ मध्ये क्वाडची शिखर परिषद भारतात होणार असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. क्वाड ही जागतिक कल्याणासाठीची शक्ती असल्याचं एकमत सर्व सदस्य देशांनी व्यक्त करत, काल या शिखर परिषदेचा समारोप झाला.

यावेळी सर्व सदस्य देशांच्या नेत्यांनी एकमतानं हिंद - प्रशांत क्षेत्रासह संपूर्ण जागतिक समुदायाच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या अनेक घोषणा केल्या.

दरम्यान डेलावेर इथली क्वाड शिखर परिषद आणि इतर कार्यक्रम आटोपून प्रधानमंत्री न्यूयॉर्कला रवाना झाले आहेत.

**<><><><><><>**

क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी सर्व सदस्य देशांच्या प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या डेलावेर इथल्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. तसंच जपानचे प्रधानमंत्री फुमियो

कीशीदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी देखील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली.

<><><><><><>

क्वाड संघटनेच्या कर्करोग मूनशॉट उपक्रमामध्ये भारत, साडेसात दशलक्ष डॉलर्सचं, आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी ४० दशलक्ष लस मात्रांचं योगदान देईल अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर डेलावेर इथं आयोजित कर्करोग मूनशॉट उपक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. सहज उपलब्ध होऊ शकेल अशी आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्याबद्दल क्वाड समुह देशांचा सामायिक निर्धार अशा उपक्रमातून प्रतिबिंबित होत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><><><>

भारतातून चोरीला गेलेल्या किंवा अमेरिकत तस्करी झालेल्या २९७ पुरातन वस्तू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या निमित्तानं अमेरिका भारताला परत करणार आहे. लवकरच या वस्तू भारतात परत आणल्या जातील. या वस्तू परत केल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी बायडेन यांचे आभार मानले आहेत.

<><><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला चार जागा देण्याची मागणी पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. ते नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते.

विदर्भातल्या उत्तर नागपूर, उमरेड, उमरखेड, वाशिम या मतदारसंघांसाठी आठवले आग्रही आहेत. राज्यात लढवणार असलेल्या एकूण जागांची यादी दोन

दिवसांत आपण महायुतीला देऊ, या सर्व जागा आमच्याच चिन्हावर लढवू, असंही आठवले यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><><>**

दलित चळवळीचं रूपांतर आर्थिक विकासाच्या चळवळीत होण्यासाठी रामदास आठवले यांनी पुढाकार घेतला, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची प्रशंसा केली आहे.

मारवाडी फाउंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार मंत्री रामदास आठवले यांना आज नागपूरमध्ये गडकरी यांच्या हस्ते प्रदान केला गेला, त्यावेळी ते बोलत होते.

मारवाडी फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

बौद्ध समाजात अनेक गट आहेत, त्यामुळे आपली ताकद वाढवण्यासाठी इतर जाती आणि धर्मांच्या लोकांना आपल्याजवळ आणणं आवश्यक असल्याचं मत रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<><><><><><>**

आगामी विधानसभा निवडणूकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष महाविकास आघाडी म्हणून, एकत्र लढणार असून, जागा वाटपासाठी चर्चा सुरु असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं. ते आज बारामतीत बातमीदारांशी बोलत होते. आरक्षण प्रश्नाशी संबंधित घटकांनी सामंजस्याची भूमिका घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सरकारनंही याबाबतीत विलंब न करता लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातल्या धनगर समाजाने जिल्ह्यातल्या सर्वपक्षीय आमदार- खासदारांच्या घरापुढं हलगी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्या निवासस्थानासमोर आज आंदोलन करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहारानं कळवलं आहे. लातूरमध्ये आमरण उपोषणास बसलेल्या धनगर समाजाच्या आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी उद्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात सकल धनगर समाजाच्या वतीनं शेळ्या-मेंढ्यासह रास्ता रोको केला जाणार आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात पुण्यातल्या एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीनं अतिरीक्त कामाच्या दबावाला कंटाळून आत्महत्या केली होती. या घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. याप्रकरणी श्रम आणि रोजगार मंत्रालयाने तपास करून चार आठवड्यात अहवाल द्यावा, अशी सूचना आयोगानं केली आहे. पीडित मुलगी केरळची रहिवासी असून ती कंपनीत चार्टड अकाऊंट म्हणून कार्यरत होती.

या घटनेवर मानवाधिकार आयोगानं चिंता व्यक्त करत खासगी कंपन्यांमध्ये जागतिक मानवी हक्क अधिकारांचं योग्य पद्धतीनं पालन केलं जात आहे की नाही याचा आढावा घेण्याच्या सूचनाही श्रम आणि रोजगार मंत्रालयाला केल्या आहेत.

<><><><><>

राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता २०३० पर्यंत ३० गिगा watt करण्याचा सरकारचा मानस आहे. याविषयी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे संचालक अभय हरणे यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**होल्ड - बाईट.....अभय हरणे**

**<><><><><><>**

कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या नाशिकमधून रेल्वेद्वारे कांद्याची निर्यात पुन्हा एकदा सुरु केली जाणार आहे. त्यासाठी रेल्वेच्या वाघिणी उपलब्ध करून देण्याचं आश्वासन रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक अरविंद मलखाडे आणि भुसावळ रेल्वे विभागाचे वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक अजय कुमार यांनी दिलं. नाशिक रोड आणि लासलगाव रेल्वेस्थानकातून नोव्हेंबर महिन्याच्या मध्यापासून ही निर्यात सुरू होईल. कांदा व्यापारी संघटनेबरोबर काल झालेल्या बैठकीनंतर रेल्वेनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

सिडको तर्फे बेलापूर ते खारघर दरम्यान बांधण्यात येणाऱ्या कोस्टल रोडला बेलापूरमधल्या नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. बेलापूर जेट्टीजवळ नागरिकांनी आज मानवी साखळी करत आंदोलन केलं. वन टाईम प्लॅनिंग अंतर्गत नवी मुंबई महापालिकेनं बेलापूरचा विकास केला, असं असताना सिडकोतर्फे कोस्टल रोडसाठी या भागात आखणी केल्याच्या विरोधात नागरिकांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

वाशिम जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे सोयाबीनसह इतर पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेक शेतकऱ्यांनी कापणी

करून ठेवलल्या सोयाबीनला पावसाचा फटका बसला. या नुकसानीचे पंचनामे करून मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

<><><><><>

मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीसाठी १४ ते २० सप्टेंबर दरम्यान ४१ जणांनी ५६ अर्ज दाखल केले होते. त्या अर्जांची छाननी केल्यानंतर ४१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. उद्यापासून बुधवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत देण्यात आलेली आहे. त्यानंतर गुरुवारी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे.

<><><><><>

चेन्नई इथं झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं बांग्लादेशावर २८० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विजयासाठी ५१५ धावांचा पाठलाग करत असलेल्या बांग्लादेशाचा दुसरा डाव, आज सामन्याच्या चौथ्या दिवशी पहिल्या सत्रातच २३४ धावांत आटोपला.

भारताचा गोलंदाज आर. अश्विन यानं दुसऱ्या डावात बांग्लादेशाचे ६ गडी बाद केले.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या २७ सप्टेंबरला कानपूर इथं होणार आहे.

<><><><><>

हंगरीची राजधानी बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताच्या पुरुष संघानं अग्रमानांकित अमेरिकेचा पराभव केला. खुल्या प्रकारात भारताच्या गुकेशनं जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर

असलेल्या फॅबियानो कारुआना याच्यावर मात केली, तर अर्जुननं लीनिएर डॉमिंगेझ पेरेझ याला हरवलं.

**<><><><><><>**

विदर्भात पुढचे पाच दिवस सलग मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. मराठवाडा इथं पुढचे दोन दिवस तर मध्य महाराष्ट्र कोकण आणि गोवा इथं मंगळवार ते शुक्रवार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><><>//**